# देशोन्नती

वैचारिक क्रांतीचा अग्रदूत

## नागपूर live

देशोन्नती सोमवार, दि. २२ सप्टेंबर २०१४


# राजभाषेला जनभाषा करा

## इग्नुतर्फे हिंदी दिवस, विभागीय संचालक डॉ. शिवस्वरुप यांचे आवाहन



प्रतिनिधी / २१ सप्टेंबर

**नागपूर :** हिंदी भाषेला राज भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर हिंदीच्या प्रचार व प्रसारासाठी वर्धा येथील राष्ट्रभाषा प्रचार समितीने १९५३ पासून मोठे कार्य केले. त्यांनी हिंदी भाषा इतरही कानाकोपऱ्यात नेण्याचे मोठे कार्य केले आहे. सध्या हिंदीला संपर्क भाषा करून सर्वसामान्यांची जनभाषा करा, असे आवाहन इग्नुचे नागपूर विभागीय निदेशक डॉ. शिवस्वरुप यांनी केले.

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठच्या नागपूर विभागीय कार्यालयात 'हिंदी दिवस २०१४' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी पत्रकार विकास मिश्र, डॉ. किशोर वाट, प्रा. रश्मी बत्रा, डी. शेषाद्री, दिलीप सोनकुसळे, सी.एच. राजगुरे, संजय पाटनकर, जगदीश टिकले, अंकुल सोनी, रामपती मिश्रा, अनिल तिवारी, सुनील पांडे आदी उपस्थित होते. पुढे डॉ. शिवस्वरुप म्हणाले, हिंदी भाषेला देशातील जवळपास नागरिकांनी स्वीकारली आहे. राजभाषा विभाग केंद्रिय गृहमंत्रालयानेही हिंदीला अधिक सोपी व सरळ करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले आहे. त्यानंतर हिंदी भाषिकांची जबाबदारी वाढली असल्याचे त्यांनी सांगितले. तर विकास मिश्र म्हणाले, इस्त्राईलसारख्या देशात त्यांच्या राष्ट्रीय हिब्रू भाषेत सर्व व्यवहार होत असून कॉम्प्यूटर सॉफ्टवेअरसुद्धा बनविण्यात आले आहे. भाषेतून संस्कृतीची झलक दिसत असून आपली भावना अधिक प्रखरतेने मांडता येत असल्याचे त्यांनी सांगितले. उपस्थित मान्यवरांनी समयोचित मार्गदर्शन केले. संचालन डॉ. विकास सिंघल यांनी तर आभार वैशाली यांनी मानले.